Kasegaon Education Society's

# Arts & Commerce College, Ashta

# Department of Geography

**On**

# Morphology of Towns & Cities

**By**

**Prof. Momin M. M.**

# *नागरी संरचना  Morphology of Towns & Cities*

## नागर संरचनेचा विकासः

### १. समकेंद्रदीप कटिबंध सिद्धांत Concentric Zone Theory

अमेरीकन शास्त्रज्ञ बर्गेस यांनी १९२३ मध्ये हा सिद्धांत मांडला आहे. या सिद्धांतानुसार नागरी केंद्राचा विकास मध्य भागापासून बाहेरच्या दिशेने होत असतो. नागरी केंद्राचा विकास जसजसा होतो, तसतसे वेगवेगळया कार्यासाठी भूमीउपयोजन अधिकाधिक होऊ लागतो. एका बिंदूतून काढलेल्या अनेक वर्तुळांच्या वलयोप्रमाणे येथे नागरी वस्तीचा विकास होतो. नगरातील भूमिउपयोजनानुसार पुढिलप्रामाणे पाच समकेंद्र कटिबंध निर्माण होतात.

## पाच कटिबंधक्रविभाग□


१. □द्रीय व्यापार कटिबंध.

२. सं□मन क्षेत्र.

३. श्रमिक क्षेत्र.

४. उच्चवर्गीय क्षेत्र.

५. अभिगमन लोकांचे क्षेत्र.



**गुणः**

१. या सिद्धांताने शहराच्या मध्यभागातून बाहेरच्या दिशेने होणारा बदल स्पष्ट होतात.

२. शहराचा मध्यभाग व्यापारासाठी व बाहेरील भाग निवारासाठी असतो, हे यावरून स्पष्ट होते.

**दोषः**

१. या सिद्धांतात नगरांचा व शहरांचा वर्तुळाकार दाखविला आहे. प्रत्यक्षात नगराचा आकार जिज्याकार, लंबाकार इत्यादी असतो.


२. हा सिद्धांत मांडताना नगर किंवा शहर जेथे वसले आहे, तेथील भूरचना समान गृहीत धरली आहे. प्रत्यक्षात सर्व ठिकाणांची भूरचना अशी नसते.

## २. द्वैत्रिज्य खंड सिद्धांत The Sector Theory:

अमेरिकन शास्त्रज्ञ होमर हायट याने १९३९ मध्ये हा सिद्धांत मांडला. या सिद्धांतानुसार शहराचा मध्यभाग वर्तुळाप्रमाणे असतो. हा भाग व्यापारी उलाढालीचे क्षेत्र असते. या वर्तुळाकार क्षेत्रापासून खंडाखंडानी (Sectorwise) शहराचा विस्तार बाहेरच्या बाजूस होतो. या सिद्धांतात निवासी भागाला महत्त्व दिले आहे. हायट यांच्यामते, श्रीमंत व उच्च वर्गातील लोक पूर्वेकडील भागात राहतात. आणि या भागाचा विस्तारही पूर्वेकडे होत जातो. हायट यांच्यामते, या भागात खालच्या वर्गातील लोक शहराच्या दक्षिणेकडील भागात राहतात. याचा विस्तारही दक्षिणेकडे होतो.

# Sector Model

- theory of urban structure
- also known as Hoyt Model
- **developed in 1939 by Homer Hoyt**
- **states that a city develops in sectors, not rings**
- certain areas are more attractive for different activities because of an environmental factor or by mere chance.
- Hoyt modified the concentric zone model to **account for major transportation routes**
- according to this model most major cities evolved around the nexus of several important transport facilities such as railroads, sea ports, and trolly lines that eminated from the city's center.
- Hoyt theorized that cities would tend to grow in **wedge-shaped patterns**, or sectors, eminating from the CBD and centered on major transportation routes.



## द्वैजिज्य खंड सिद्धांत विभाग□

१. मध्यवर्ती व्यापार क्षेत्र.

२. लघु व मोठे उद्योग.

३. खालच्या वर्गातील लोकांचे निवासी क्षेत्र.

४. मध्यम वर्गीय लोकांचे निवासी क्षेत्र.

५. उच्च वर्गीय लोकांचे निवासी क्षेत्र.

### गुणः

या सिद्धांतानुसार नगरे वा शहरातील व्यापार क्षेत्रे व निवास क्षेत्रे स्पष्ट होतात.


### दोषः

या सिद्धांतानुसार केवळ निवास क्षेत्रालाच अधिक प्राधान्य दिले आहे.

## ३. बहुकेंद्रीय सिद्धांत  The Multi-Nuclic Theory:

हॅरिस आणि उलमन यांनी १९४७ मध्ये हा सिद्धांत मांडला. या सिद्धांतानुसार शहराची संरचना फक्त एका केंद्राभोवती होत असतो. हॅरिस आणि उलमन या शास्त्रज्ञाच्या मते, प्रत्येक केंद्रात विशिष्ट प्रकारचे कार्य चालते. उदा: शहरात मध्यवर्ती व्यापारी क्षेत्र, निवासी क्षेत्र, औद्योगिक क्षेत्र, शैक्षणिक क्षेत्र, प्रशासकीय क्षेत्र, सांस□तिक क्षेत्र, असे विविध भाग असतात. शहरांची जसजशी प्रगती होते, तसतसे हे भाग निर्माण होतात. प्रत्येक भागाचे कार्य भिन्न असते आणि त्या भागात केलेला भूमीचा वापरही विशिष्ट कारणासाठी केलेला असतो.

# A PRESENTATION ABOUT “ MULTIPLE NUCLEI MODEL”




- Prepared By-
- Shah Mohammad Atikul Haque
- Department of Urban and Regional Planning
- Batch:14th
- Roll:1884

## बहुकेंद्रीय सिद्धांत विभाग

१. मध्यवर्ती व्यापार क्षेत्र.

२. ठोक मालाची दुकाने व लघुउद्योग.

३. कनिष्ठ वर्गातील लोकांचे निवासी क्षेत्र.

४. मध्यम वर्गीय लोकांचे निवासी क्षेत्र.

५. उच्च वर्गीय लोकांचे निवासी क्षेत्र.

६. मोठे अवजड उद्योग.

७. व्यापारी बाह्य क्षेत्रे.

८. निवासी क्षेत्रे.

९. औद्योगिक क्षेत्रे.

**गुणः**

अलीकडे नगरांची वा शहरांची झालेली प्रचंड वाढ लक्षात घेता हा सिद्धांत बरोबर वाटतो.

**दोषः**

मोठी शहरे वगळता इतर शहरात भूमीउपयोजन या सिद्धांताप्रमाणे आढळत नाही.